NATIONAL HEALTH MISSION
राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन

सत्यमेव जयते
Ministry of Health & Family Welfare
Government of India

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

# २ ते ५९ महिने वयोगटातील बालकांमधील न्यूमोनियाची बाह्यरुग्ण स्तरावर उपाययोजना

## प्रतिजैविक उपचारपद्धती

## ॲमॉक्सिसिलीन ५ दिवस मुखावाटे द्या

| वय किंवा वजन | सिरपच्या स्वरुपात मुखावाटे देण्याच्या ॲमॉक्सिसिलीनची मात्रा (१२५ मि.ग्रॅ./५ मि.ली.) ५ दिवस, दिवसातून २ वेळा | गोळ्यांच्या स्वरुपात मुखावाटे देण्याच्या ॲमॉक्सिसिलीनची मात्रा (२५० मि.ग्रॅ.ची गोळी) ५ दिवस, दिवसातून २ वेळा |
|---|---|---|
| २ महिने ते ४ महिने (४ ते ६ कि.ग्रॅ.पेक्षा कमी) | ५ मि.ली. | १/२ |
| ४ महिने ते १२ महिने (६ ते १० कि.ग्रॅ.पेक्षा कमी) | १० मि.ली. | ११ |
| १२ महिने ते ३ वर्ष (१० ते १४ कि.ग्रॅ.पेक्षा कमी) | १५ मि.ली. | १/२ |
| ३ वर्ष ते ५ वर्ष (१४ ते २० कि.ग्रॅ.पेक्षा कमी) | - | २ |

## खोकला आणि सर्दीसाठी घरगुती उपचार

- ६ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या तसेच निव्वळ स्तनपान घेणाऱ्या अर्भकाला कोणत्याही प्रकारची घरगुती औषधे देऊ नयेत.
- स्तनपान देणे चालू ठेवा.
- जर बालक ६ महिन्यांपेक्षा अधिक वयाचे असेल तर त्याला खोकल्यापासून आराम मिळण्यासाठी घरगुती सुरक्षित औषधी पदार्थ द्या, जसे मध, तुळस, आले, औषधी काढे आणि अन्य सुरक्षित स्थानिक औषधी पदार्थ. त्याला कफ सिरप देणे टाळा.
- बालकाच्या नाकपुडीत औषधी थेंब (उकळून थंड केलेल्या पाण्यात मीठ मिसळा) टाकून त्याचे नाक साफ ठेवा तसेच मऊ सुती कापडाने त्याचे नाक स्वच्छ करा.
- घरी औषधे कशी द्यावीत यासाठी कुटुंबियांना खास सूचना द्याव्या.

## २ दिवसांनी पाठपुरावा करा.

- खालील धोक्याची लक्षणे आढळल्यास त्वरीत आरोग्य संस्थेत जा.

- **बालकाचे आजारपण वाढणे.**
- **गिळता न येणे नाही किंवा दूध पिता न येणे.**
- **श्वासोच्छवास वेगाने होणे.**
- **श्वासोच्छवास करताना त्रास होणे.**
- **ताप येणे.**

**वरीलपैकी कोणतेही लक्षण दिसून आल्यास अर्भकाला आशा किंवा एएनएम यांच्याकडे किंवा नजिकच्या आरोग्य केंद्रात त्वरीत घेऊन जा.**

SAANS
साँस
निमोनिया नहीं, तो बचपन सही

Paste in casualty, emergency & paediatric ward.